मंगळवार, दि. २२ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३४७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# वार, वेळ, ठिकाण निश्चित करा

## आपचे महापालिकेला खुले आव्हान; घोटाळ्याप्रकरणी जनतेसमोर खुली चर्चा करा

**जालना । प्रतिनिधी** - जालना शहरातील ५० कोटी रुपयांच्या कथित गैरव्यवहारासंदर्भात आम आदमी पक्षाने केलेल्या आरोपांचे खंडन करत महानगरपालिकेने आपली बाजू स्पष्ट केली असली, तरी ती समाधानकारक नसल्याचे सांगत आपने महापालिकेला खुले चर्चे चे आव्हान दिले आहे.

२० जुलै रोजी शिवाजी पुतळा येथे झालेल्या पत्रकार परिषदेत आपच्या वतीने सांगण्यात आले की, पालिकेच्या कामकाजातील पारदर्शकता व इमानदारी जनतेसमोर यावी, यासाठी खुली चर्चा आवश्यक आहे. आपच्या म्हणण्यानुसार, महापालिकेने आपल्या बाजूने केलेले खंडन अपूर्ण व तथ्यहीन आहे.

त्यामुळे त्यांनी लेखी निवेदनाद्वारे असे स्पष्ट केले आहे की: महापालिकेने विभागीय आयुक्तांचा चौकशी अहवाल (२०१९), अंदाज समितीचा अहवाल (२०११ ते २०२०), तसेच आम्ही लावलेल्या चार प्रमुख मुद्द्यांवरील खंडन करणारे कागदपत्रे घेऊन सात दिवसांच्या आत जनतेसमोर सर्व माध्यमांच्या साक्षीने खुली चर्चा आयोजित करावी. वेळ, वार व ठिकाण निश्चित करून आम्हाला आणि प्रसारमाध्यमांना निमंत्रित करावे.

आपच्या वतीने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात हेही नमूद आहे की, जर महापालिकेने सात दिवसांत ही चर्चा आयोजित केली नाही, तरः महापालिकेला लावलेले सर्व आरोप हे त्यांनी अप्रत्यक्षपणे मान्य केले, असे आम्ही समजणार आहोत. त्यानंतर आम आदमी पार्टी संपूर्ण जालना शहरात हे प्रकरण जनतेसमोर ठामपणे मांडेल.

हे निवेदन आपचे महानगर अध्यक्ष संजोग हिवाळे आणि महानगर महासचिव तनुज बाहेती यांच्या स्वाक्षरीसह सादर करण्यात आले आहे.

## माणिकराव कोकाटे राजीनामा देणार?

**मुंबई** - विधानसभेत रमी खेळताना व्हिडीओ व्हायरल झालेल्या प्रकरणी राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे मंगळवारी त्यांची भूमिका स्पष्ट करणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर कोकाटे आणि अजित पवार यांचे फोनवरुन संभाषण झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यावर माणिकराव कोकाटे मंगळवारील सकाळी ९ वाजता पत्रकार परिषद घेणार आहेत.

# ‘शब्दाला जागणं हीच आमची ओळख’

## जालना प्रभाग २९ मध्ये ट्रिमिक्स रस्त्याचे आ. खोतकर यांच्या हस्ते उद्‌घाटन

**जालना । प्रतिनिधी** - जालना महानगरपालिकेच्या विशेष विकास योजनेअंतर्गत, प्रभाग क्रमांक २९ मधील टीव्ही सेंटर परिसरात सी.सी. ट्रिमिक्स रस्त्याच्या कामाचे उद्घाटन आमदार तथा अंदाज समिती प्रमुख अर्जुनरावजी खोतकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

या उद्घाटन कार्यक्रमात आमदार खोतकर यांनी परिसरातील नागरिकांशी थेट संवाद साधला. त्यांच्या विविध अडचणी जाणून घेत, काही समस्यांवर तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना दूरध्वनी करून कार्यवाहीचे आदेश दिले. जालना विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी मी एक भूमिपुत्र म्हणून सदैव तत्पर आहे, असे ते म्हणाले.

कार्यक्रमादरम्यान परिसरातील नागरिकांनी टीव्ही सेंटर भागात सुरू असलेल्या विविध विकास कामांचा उल्लेख करत समाधान व्यक्त केले. आपण दिलेला शब्द पाळला, असे म्हणत नागरिकांनी आमदार खोतकर यांचे आभार मानले. ‘शब्दाला जागणं हीच आमची ओळख’ अशी प्रतिमा आ. खोतकर यांनी निर्माण केली आहे.

शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहरप्रमुख विष्णू पाचफुले, तसेच गणेश सुपारकर, लक्ष्मण नाना अवघड, मेघराज चौधरी, गोपी गोगडे, ज्ञानेश्वर सुपारकर, शिवसिंग तलवारवाले, प्रवीण जगताप, राऊत मामा, संतोष रासवे, ज्ञानेश्वर ढवळे, अनिल देशमुख, रामेश्वर गोरे, भगवान धिरडे, नारायण तारगे, पटेकर काका, सोपान काका, मुनरकर मदन देशमुख, अजय मापारी, आकाश गोरे, प्रमोद पवार, रोहिणी टकले, संगीता देशमुख, शारदा गोरे यांच्यासह शिवसेना-युवासेना पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



युवा आदर्श

प्रतिनिधी ...

संसद भवन आपले
असते अमोल ठेवा
सर्वां असे अभिमान
पावित्र्य राखून ठेवा
कामकाज असे हवे
सगळे करी वाहवा
चर्चा रे सकारात्मक
विचार झरा वहावा
वाद विवाद संपावा
पायंडा नवा पडावा
विधायक विधेयका
उगा विरोध सोडावा
रयतेचा नेत्यावरती
संपूर्ण विश्वास हवा
आपले ते प्रतिनिधी
नको केवळ ही हवा
बहिष्कार गोंधळांस
मिळो जरा विसावा
कायदा सु व्यवस्था
विश्वास बा बसावा
सत्ताधारी विरोधकां
दुरावा कधी नसावा
दोन्ही जनतेचे सेवक
लोकशाही रे विसावा
अधिवेशन स्वर्णसंधी
फायदा जरूर घ्यावा
प्रत्येकक्षण अनमोल
जन स्तकार्या द्यावा

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

# गणगण गणात बोते जयघोषाने दुमदुमले जालना

## गजानन महाराज पालखीचे मुस्लिम समाजाकडून स्वागत





**जालना । प्रतिनिधी** - पंढरपूर आषाढी वारीनंतर परतीच्या मार्गावर असलेली शेगाव येथील संत गजानन महाराजांची पालखी दिंडी आज दिनांक २१ जुलै रोजी जालना शहरात दाखल झाली. दुपारी तीन वाजता पालखी नूतन वसाहत परिसरात पोहोचताच हिंदू-मुस्लिम ऐक्याचे अनोखे दर्शन घडले.

मुस्लिम समाज बांधवांनी वारकऱ्यांचे पुष्पवर्षे सत्कार करत, पालखीचे मनोभावे स्वागत केले. गणगण गणात बोतेच्या जयघोषात परिसर दुमदुमून गेला. या सुंदर क्षणी वारकरी आणि स्थानिक नागरिकांनी एकत्रितपणे गजानन महाराजांच्या पालखीचे दर्शन घेतले.

प्रत्येक वर्षीप्रमाणे यंदाही मुस्लिम बांधवांनी वारकऱ्यांना गुलाब पुष्प देऊन, त्यांचा यथोचित सत्कार केला. यावेळी भाविकांची मोठी गर्दी शहरात पाहायला मिळाली. पालखीबरोबर सुमारे ७०० वारकरी, ३ घोडे, एक रुग्णवाहिका, रथ व गाड्यांचा ताफा सहभागी झाला होता.

यावेळी माजी आमदार कैलास गोरंट्याल, शेख इब्राहीम, शेख अरशद, आसिफ पठाण, जमील शेख, अज़हर शेख, नारायण वाडेकर, बाबासाहेब सोनवणे, अलीम शेख, अमोल भोसले, आदिल चाऊस यांच्यासह मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पालखीच्या स्वागतातील गर्दीत दागिने चोरण्याचा प्रयत्न

### दोन महिलांना पकडून दिले पोलिसांच्या ताब्यात




**जालना । प्रतिनिधी** - संत गजानन महाराजांच्या पालखीच्या स्वागतासाठी आज जालन्यात झालेल्या गर्दीत दागिने चोरण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन महिलांना नागरिकांनी रंगेहात पकडले. हा प्रकार आज, दिनांक २१ जुलै रोजी दुपारी चार वाजता नूतन वसाहत परिसरात घडला असून कदीम जालना पोलिसांकडे त्या दोघींना सुपूर्द करण्यात आले आहे.

आषाढी एकादशीनंतर परतीच्या प्रवासात असलेली संत गजानन महाराजांची पालखी सोमवार (दि २१) जालना शहरात पोहोचली. दर्शनासाठी मोठ्या संख्येने पान ३ वर

## जालना महापालिकेच्या वतीने गजानन महाराज पालखीचे स्वागत

**जालना । प्रतिनिधी** - संत श्री गजानन महाराज यांची पालखी सोमवार (दिनांक २१) रोजी परतीच्या प्रवासात जालना शहरात दाखल झाली. यावेळी जालना महानगरपालिकेच्या वतीने अंबड रोडवरील इंदेवाडी पाणी टाकीजवळ पालखीचे आयुक्त श्री संतोष खांडेकर यांच्या हस्ते औपचारिक स्वागत करण्यात आले.

या स्वागत प्रसंगी महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त अपर्णा जाधव, सुप्रिया चव्हाण, केशव कानपुडे, नगर अभियंता सय्यद सउद, विद्युत अभियंता गावंडे मॅडम, कार्यालय अधीक्षक विजय फुलंब्रीकर, संजय भालेराव, गणेश बत्तीन, सचिन मेहरा, आनंद मोहिदे, बंडू चव्हाण यांची उपस्थिती होती.

शहरात पालखीचे आगमन हे धार्मिक श्रद्धा, सामाजिक समरसता आणि प्रशासनाच्या सहकार्याचे प्रतीक ठरले.




महापालिकेच्या वतीने पालखी मार्गावरील स्वच्छता, पाण्याची सुविधा व नियोजनासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती.

## ‘जनसुरक्षा विधेयक २०२४’ रद्द करण्याची जाफराबाद कॉँग्रेस कडून मागणी



**जाफराबाद । प्रतिनिधी** - महाराष्ट्र विधानसभेत नुकतेच मंजूर करण्यात आलेले ‘जनसुरक्षा विधेयक २०२४’ हे भारतीय संविधान आणि लोकशाही मूल्यांविरोधात असल्याचा आरोप करत, कॉँग्रेस पक्षाच्या वतीने आज जाफराबाद तहसील कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले.

या विधेयकाच्या विरोधात दिलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, हे विधेयक भारतीय नागरिकांना संविधानाने पान ३ वर

# संपादकीय

## महान पार्श्वगायक



हिंदी चित्रपट सृष्टीतील महान पार्श्वगायक मुकेश यांची आज जयंती. २२ जुलै १९२३ रोजी मुकेश यांचा जन्म झाला. मुकेश यांचे संपूर्ण नाव मुकेश चंद माथूर असे होते. दिल्लीतील दारियागंज आणि चांदणी चौकात त्यांचे बालपण गेले. त्यांच्या वडिलांचे नाव जोरावर चंद माथूर असे होते ते इंजिनिअर होते तर आई राणी या गृहिणी होत्या. मुकेश यांना बालपणापासून संगीताची आवड होती. त्याकाळातील प्रख्यात गायक कुंदनलाल सहगल यांचे ते प्रशंसक होते. त्यांनाही कुंदनलाल सहगल यांच्याप्रमाणे अभिनेता व गायक व्हायचे होते त्यासाठी त्यांनी लहान वयातच त्यांची संगीताचे प्राथमिक धडे गिरवले. त्याकाळातील गाजलेले अभिनेते मोतीलाल यांनी मुकेश यांना त्यांच्या दूरच्या बहिणीच्या लग्नात गाताना पाहिले. मुकेश यांचा आवाज ऐकता क्षणीच ते त्यांच्या आवाजाच्या प्रेमात पडले. एक दिवस हा आवाज हिंदी चित्रपट सृष्टिचा आवाज बनेल असे ते त्यांच्या आई वडिलांना म्हणाले. त्यांनी मुकेश यांना मुंबईत आणले आणि गायक पंडित जगन्नाथ यांच्याकडून गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यास सांगितले. त्यांनीही गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले. या दरम्यान त्यांना काही चित्रपटात अभिनयाच्या ऑफर्स आल्या. मुकेश यांचा राजबिंडा चेहरा आणि स्मितहास्य यामुळे त्यांना थेट नायकाच्या भूमिका मिळाल्या. १९४१ साली निर्दोष या चित्रपटात त्यांनी पहिल्यांदा अभिनय केला. त्यानंतर चार पाच चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या मात्र त्यांनी अभिनय केलेले चित्रपट काही विशेष चालले नाही त्यामुळे नायक बनण्याचे आपले स्वप्न बाजूला ठेवून त्यांनी गायनावर लक्ष केंद्रित केले. गायक म्हणून मुकेश यांना पहिला ब्रेक मिळाला तो १९४५ साली आलेल्या पहिली नजर या चित्रपटात. या चित्रपटात त्यांनी गायलेले दिल जलता है तो जलने दो हे गीत खूप लोकप्रिय झाले. या गीतामुळे चित्रपट सृष्टित त्यांची ओळख निर्माण झाली. या गाण्यावर कुंदनलाल सहगल यांच्या शैलीचा प्रभाव होता. १९५८ साली आलेल्या यहुदी या चित्रपटातील ये मेरा दिवानापन है हे गाणे देखील खूप गाजले या गाण्याद्वारे त्यांनी स्वतःची वेगळी शैली निर्माण केली आणि कुंदनलाल सहगल यांच्या प्रभावातून ते बाहेर पडले. त्यानंतर हिंदी चित्रपट सृष्टित मुकेश युग सुरू झाले. त्यांनी अनुनासिक शैलीत गायलेले गाणे हिट होऊ लागले. मेला आणि अंदाज या चित्रपटात त्यांनी गायलेले सर्व गाणी लोकप्रिय झाले. अंदाज हिट झाल्यानंतर मुकेश रणजित नावाच्या स्टुडिओत गायनाचा रियाज करीत होते तेंव्हा तिथे एक देखणा तरुण आला आणि म्हणाला किती भावनाप्रधान आहे तुझा आवाज. मला तुझा आवाज खूप आवडतो. तो तरुण होता राज कपूर. पुढे राज कपूर आणि मुकेश हे हिंदी चित्रपट सृष्टीतील यशाचे समीकरण बनले. या जोडीने अनेक हिट गाणी दिले. आग, आवरा, श्री ४२०, बरसात, परवरिश, अनाडी, संगम, मेरा नाम जोकर या आर के बॅनरच्या चित्रपटातील मुकेश यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. राज कपूर यांचा आवाज अशीच मुकेश यांची ओळख निर्माण झाली. राज कपूर यांच्या सत्यम शिवम सुंदरम या चित्रपटातल्या गाण्याचे रेकॉर्डिंग करून ते अमेरिकेला गेले होते. डेट्रॉय मिशिगन मध्ये २७ ऑगस्ट १९७६ रोजी ते लवकर उठून अंघोळीसाठी गेले असता अचानक त्यांच्या छातीत कळ आली आणि त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या निधनानंत राज कपूर यांनी आज माझा आवाज कायमचा हरपला! अशी प्रतिक्रिया दिली. मुकेश यांनी तीन दशकांहून अधिक काळ आपल्या अनोख्या गायन शैलीने रसिकांवर मोहिनी घातली. मुकेश यांचा दर्दभरा आवाज रसिकांच्या मनावर कायमचा कोरला गेला आज इतक्या वर्षानीही त्यांचा दर्दभरा आवाज रसिकांना मोहित करतो. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. रजनिगंधा या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला मात्र ते रसिकांच्या मनात त्यांचे जे स्थान आहे त्याला सर्व पुरस्काराहून श्रेष्ठ आहे मानत. त्यांच्यासारखा महान पार्श्वगायक पुन्हा होणार नाही. जयंतीदिनी मुकेश यांना भावपूर्ण आदरांजली!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# नाटो आणि ट्रम्प यांनी व्यापार संदर्भात भारताला धमकी देणे बंद करावे

सध्याच्या परिस्थितीत अमेरिका व नाटो देश जगात आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी टॅरिफ बॉम्बचा वापर करतांना दिसत आहे.त्यामुळे नाटो भारताला धमकी देत आहे की रशियाशी व्यापार थांबवा अन्यथा भारतावर १०० टक्के टॅरिफ लादण्यात येईल. टॅरिफच्या बाबतीत अमेरिका व नाटोने भारताला धमकी देऊ नये याचे विपरीत परिणाम त्यांनाच भोगावे लागतील हेही लक्षात ठेवले पाहिजे. आज जगात वर्चस्वाच्या लढाईत अमेरिका व नाटो देश उतरले आहेत आणि आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी अमेरिका व नाटो प्रत्येक देशांवर दबाव तंत्राचा वापर करीत आहेत. जेनणेकरून इतर देशांमध्ये भितिचे वातावरण निर्माण व्हावे व आपल्या दबावात रहावे. रशिया हा भारताचा घनिष्ठ मित्र आहे आणि राहील ही बाब जगाला सुद्धा माहित आहे.त्याचप्रमाणे भारताचे अमेरिकेसोबत सुध्दा संबंध चांगले आहेत. परंतु अमेरिकेची दोगली आणि स्वार्थी निती पहाता भारत अमेरिकेपासून सावधगिरी बाळगत आहे.कारण भारताचे कट्टर दुष्मण पाकिस्तान व चीन आहे.परंतु भारताचे वाढते वर्चस्व पहाता अमेरिका पाकिस्तानला उजेडातुन व आंधारातुन सर्वतोपरी मदत करीत आहे.त्यामुळे भारताची वाढती शक्ती व जागतिक संबंध पहाता अमेरिका व नाटो यांच्यात जेलसीची भावना निर्माण झाली आहे.त्यामुळे भारताचे पाय ओढण्यासाठी अमेरिका व नाटो रशियाशी व्यापार थांबावा यासाठी भारतासह अनेक देशांवर दबाव तंत्राचा वापर करीत आहेत.युक्रेन आणि रशिया यांच्यात २४ फेब्रुवारी २०२२ पासुन युध्द सुरू आहे आणि आता हे युध्द विनाशकारी होत आहे.या युध्दात नाटोसह अमेरिका युक्रेनला संपूर्ण युध्द सामग्रीची मदत करीत आहे यामुळेच आज युक्रेनचे मनोबल वाढले आहे.परंतु रशियाच्या अनेक अडचणी वाढतांना दिसतात.कारण त्याचीही मनवीय आणि वित्तीय हानी मोठ्या प्रमाणात झाली आहे आणि होत आहे.तरीही रशिया युक्रेन व नाटोला जशास तसे उत्तर देत आहे.याच पार्श्वभूमिवर रशियाचे खच्चीकरण करण्यासाठी नाटोने कठोर भूमिका घेतली असून रशिया सोबत व्यापार संबंध असणाऱ्या देशावर नाटोची करडी नजर आहे.त्यामुळे रशियाशी जवळीक असलेल्या व व्यापार करणाऱ्या ब्राझील, चीन आणि भारत यासारख्या देशांवर कठोर निर्बंध लादण्याचा इशारा नाटोचे सेक्रेटरी जनरल मार्क रूट यांनी १६ जुलै २०२५ दिला.परंतु मार्क रूट ने असे समजू नये की भारत नाटोला घाबरेल.भारत सर्वगुणसंपन्न आहे आणि भारत आपल्या आवश्यकतेनुसार उर्जा निर्मितीसाठी रशियाकडून तेल खरेदी करीत असतो आणि खरेदी करीत राहिल. त्यामुळे अमेरिकेने टेंशन घेरण्याची गरज नाही.कारण रशिया-भारताचे मित्रत्वाचे संबंध आहे त्यामुळे अमेरिकेने भारतावर दबाव टाकण्याचा प्रयत्नही करू नये.कारण




रशिया-भारत यांच्यात खरे मित्रत्व आहे ही बाब जगाला सुद्धा माहित आहे व दिसत आहे.परंतु अमेरिका स्वतःच्या वर्चस्वासाठी पाकिस्तान सारख्या आतंकवादी राष्ट्रांना मांडीवर घेऊन डोनाल्ड ट्रम्प नोबेल शांती पुरस्कारासाठी भिक मांगतांना दिसतो.परंतु भिकाऱ्यांना प्रत्येक देश भिक देईलच असे नाही.सध्याच्या परिस्थितीत डोनाल्ड ट्रम्प संपूर्णपणे स्वार्थी झाला असून मनमानी करीत असुन मानवी विचारांची हत्या करीत आहे. कारण डोनाल्ड ट्रम्प जगाच्याच नाही तर ते स्वतःच्या देशातील लोकांच्या नजरेतुन सुध्दा उतरले आहे प्रख्यात उद्योगपती एलन मस्क यांच्यासोबत सुध्दा डोनाल्ड ट्रम्प यांचे चांगलेच खटकले आहे.जगातील अनेक देशातुन लाखो विद्यार्थी अमेरिकेत शिकायला जायचे परंतु डोनाल्ड ट्रम्पच्या हेकडीमुळे,मनमानी कायद्यामुळे आणि टॅरिफचा वाढता भार पहाता जगातील ७० टक्के विद्यार्थ्यांचा अमेरिकेपासून मोहभंग झाला आहे. म्हणजे डोनाल्ड ट्रम्प व अमेरिका सरकार सर्वच बाबतीत तानाशाहवर उतरल्याचे दिसून येते.परंतु अमेरिका ही बाब विसरत आहे आता जे पाप करीत आहे त्याचे प्रायश्चित्त त्याला भोगावेच लागेल.भारत कोणालाच भित नाही आणि भीनारसुध्दा नाही.कारण आपली ऊर्जा सुरक्षिततेसाठी भारत २७ देशातुन कच्च्या तेलाची आयात करीत असे. परंतु वाढती आवश्यकता पहाता यात वाढ झाली असून श आता भारत ४० देशांकडून तेल आयात करीत आहे.त्यामुळे रशियावरील प्रतीबंधीत कोणत्याही कारवाईची भारताला चिंता नाही याची अमेरिकेने जाणीव ठेवावी.संपुर्ण जगाला कल्पना आहे की अमेरिका धोकेबाज आणि स्वार्थी देश आहे तो केव्हाही कधीही कोणालाही धोका देवू शकतो याचे अनेक उदाहरणे जगासमोर आहे.अफगानिस्तानला रक्ताच्या लाथोळ्यात सोडून अमेरिकेने अफगानिस्तानमधुन पळ काढला व यात लाखो निरपराधांचा बळी गेला याला कारणीभूत अमेरिका आणि ऑगस्ट २०२१ मध्ये अफगाणिस्तानचा ताबा तालिबानने घेतला.त्याचप्रमाणे स्वतःच्या स्वार्थासाठी युक्रेनला अमेरिकेने युध्दाच्या खाईत लोटले व लाखोंच्या निरपराधांचा बळी गेला व जात आहे सोबत अनेक ठीकाणे नामशेष होत आहे. अशाप्रकारे आजच्या परिस्थितीत अमेरिका कोणाचा केव्हा घात करेल हे सांगता येत नाही. त्यामुळे जगातील संपूर्ण राष्ट्रांनी अमेरिका व मुख्यत्वेकरून डोनाल्ड ट्रम्प पासून सावधगिरी बाळगली पाहिजे अन्यथा घात होवू शकतो.प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचा घनिष्ठ मित्र समजला जाणारा डोनाल्ड ट्रम्प आज भारताचा कट्टर शत्रू आतंकिस्तान पाकिस्तानला जवळ करीत आहे यावरून आपण समजू शकतो डोनाल्ड ट्रम्प शांतीचा पुरस्करता नसुन आतंकवाद्यांचा मदतगार आहे.सध्याच्या परिस्थितीत डोनाल्ड ट्रम्प नोबेल शांती पुरस्कारासाठी मोठी धडपड करीत आहेत.भारत-पाकिस्तानमधील युद्धविराम मी केला असे डोनाल्ड ट्रम्प एकवेळा नाही तर २४ वेळा सांगितल्याचे जाहीर केले आहे.आता असेही म्हणत आहे की ५ लडाकू पडले पण कोणाचे पडले ते सांगायला तयार नाहीत. भारत-पाकिस्तानला व्यापार व्यवहार थांबविण्याची धमकी दिली तेव्हा युद्धविराम झाला असा दावा नुकताच डोनाल्ड ट्रम्प यांनी केला.यावरून स्पष्ट होते की डोनाल्ड ट्रम्प बोलतात एक आणि करतात वेगळेच काही त्यामुळे आता डोनाल्ड ट्रम्प पानचट झाल्याचे स्पष्ट दिसून येते.आता जगाच्या लक्षात आले की डोनाल्ड ट्रम्प जेवढीही काही खटाटोप करीत आहे ती फक्त नोबेल शांतता पुरस्कारासाठी परंतु डोनाल्ड ट्रम्प आजही नोबेल पुरस्कारांपासून कोसोदुर आहेत.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र मंदिर महासंघाचे मंदिर - न्यास जिल्हा अधिवेशन !

# मंदिर विश्वस्त संघटित झाल्यास मंदिरावरील आघात थांबतील !

## श्री १००८ महामंडलेश्वर योगेशानंद गिरीजी महाराज




**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** धर्मासाठी सर्वांना संघटित व्हावे लागेल. संघटनामुळे अधर्म संपतो, हे आर्य चाणक्यांनी धनानंदला संपवून दाखवून दिले. धर्म टिकला तरच आपण टिकणार आहोत. देव, देश, मंदिर आणि धर्म यांवर होणाऱ्या आघातांविषयी हिंदूंनी जागृत व्हावे. सर्व मंदिर विश्वस्त संघटित झाल्यास मंदिरावरील आघात थांबतील. वेळीच जागे व्हा, तरच जागेवर राहाल, अन्यथा ही जागा सोडून जावे लागेल, असे प्रतिपादन श्री १००८ महामंडलेश्वर योगेशानंद गिरीजी महाराज यांनी केले. ते अधिवेशनाच्या प्रथम सत्रात बोलत होते. श्री काशी विश्वनाथ बाबा संस्थान, दत्त मंदिर, बीड बायपास, श्री पावन गणेश मंदिर, दिवाण, देवडी, सोमठाणा येथील श्री रेणुकामाता मंदिर, हिंदु जनजागृती समिती आणि महाराष्ट्र मंदिर महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र मंदिर न्यास जिल्हा अधिवेशन पार पडले. श्री काशी विश्वनाथ बाबा संस्थान, दत्त मंदिर, बीड बायपास येथे पार पडलेल्या अधिवेशनाचा शुभारंभ सनातन संस्थेचे धर्मप्रचारक सद्गुरु नंदकुमार जाधव, श्री १००८ महामंडलेश्वर योगेशानंदगिरीजी महाराज, पू. यशवंत शिवनगिरीकर महाराज, माजी सहाय्यक धर्मदाय आयुक्त श्री. दिलीप देशमुख, हिंदु जनजागृतीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक श्री. सुनील घनवट, सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश श्री. प्रल्हाद शिंदे यांच्याहस्ते दिपप्रज्वलनाने झाला. त्यानंतर सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रम्ह प.पू. डॉ. जयंत बाळाजी आठवले यांनी दिलेल्या संदेशाचे वाचन श्री. रामेश्वर भुकन यांनी केले. उपस्थितांचे स्वागत सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश श्री. प्रल्हाद शिंदे यांनी केले तर अधिवेशनाची प्रस्तावना हिंदु जनजागृती समितीचे उत्तर महाराष्ट्र संघटक श्री. प्रशांत जुवेकर यांनी मांडली. या अधिवेशनाला परभणी, नांदेड, जालना, जळगाव आणि छत्रपती संभाजीनगर येथील विविध मंदिरांचे १८० हून अधिक विश्वस्त, प्रतिनिधी उपस्थित होते.

**मंदिरांमध्ये चालू असलेल्या पाश्चात्य कुप्रथा थांबवा ! - सुनील घनवट, महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक, हिंदु जनजागृती समिती**

अनेक मंदिरातील मूर्तींना नाताळच्या काळात सांताक्लोजचा वेष परिधान केला जातो. देवाचा केक कापून वाढदिवस साजरा करणे, मंदिरात दान दिलेल्या वस्तूंचा अयोग्य वापर, काही ठिकाणी देवस्थानांच्या गायी कसायांना विकणे यांसारख्या कुप्रथा घडत आहेत. तसेच वैयक्तिक मानापमानामुळे अनेक मंदिराकडे दुर्लक्ष करणे, यामुळे मंदिर संस्कृती आणि मंदिरे बदनाम होत आहे, यावर उपाय म्हणजे मंदिर विश्वस्तांनी मंदिर संस्कृती परंपरा प्रथा यांचे पालन हिंदु संस्कृती नुसार करा, असे प्रतिपादन हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक श्री. सुनील घनवट यांनी केले.

**मंदिरे - धर्मशिक्षणाची केंद्रे बनायला हवी ! - सद्गुरू नंदकुमार जाधव**

मंदिर हा हिंदु संस्कृतीचा वारसा आहे, तो जतन करणे महत्त्वाचे आहे. आपला धर्म, संस्कृती जीवंत ठेवण्याचे कार्य वेळोवेळी मंदिरांमुळे झालेले आहे. मंदिर संस्कृतीचा देशाच्या विकासात मोठा वाटा आहे. मंदिरात येणाऱ्यांना धर्माचा अभ्यास नसतो. तीर्थक्षेत्र पर्यटन क्षेत्र झाली आहेत. त्यामुळे तेथील आध्यात्मिक शक्तीचा लाभ होत नाही. मंदिरांमधून धर्मशिक्षण दिले तर त्यांची श्रद्धा वाढून सशक्त राष्ट्रभक्ती असणारी पिढी निर्माण होईल आणि ती राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात योगदान देईल. मंदिरांतून संस्कारवर्ग घेणे, धर्मशास्त्र समजावून सांगणे हे कार्य नियमित व्हायला हवे. हिंदु समाजाची जन्म हिंदु ते कर्म हिंदु पर्यंत वाटचाल होण्यासाठी मंदिर अधिवेशन हे प्रभावी माध्यम आहे. म्हणून मंदिरे ही धर्मशिक्षणाची केंद्रे बनायला हवी, असे आवाहन सनातन संस्थेचे धर्मप्रचारक सद्गुरू नंदकुमार जाधव यांनी केले.

या वेळी निवृत्त सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. दिलीप देशमुख यांनी न्यास नोंदणी तसेच मंदिरांच्या अडचणीसंदर्भात तर सनातनचे संत पू . सुरेश कुलकर्णी यांनी तुळजाभवानी देवस्थानातील भ्रस्टाचाराविषयी दिलेल्या कायदेशीर लढ्याविषयी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात मंदिर विश्वस्तांना मंदिरांच्या जमिनीविषयी येणाऱ्या अडचणी याविषयी परिसंवाद आयोजित करण्यात आला. समारोपीय सत्रात मंदिर महासंघाच्या कार्याची पुढील दिशा कशी असावी ? याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. समारोपीय सत्रात महंत नारायण नंदगिरी महाराज, श्री. श्यामकुमार जैस्वाल, श्री. प्रमोद नरवाडे, कु. प्रतीक्षा कोरगावकर, कु. प्रियंका लोणे यांनी उपस्थितांना संबोधित केले.

## वाचकांचे मनोगत

# पावसाळी अधिवेशनातील आमदारांच्या वर्तनुकीची राज्यपालांनी नोंद घ्यावी !



महायुती ( भाजप +शिवसेना शिंदे गट + राष्ट्रवादी अजित पवार गट )पावसाळी अधिवेशनातील आमदार, मंत्री यांची वर्तनुक चिंताजनक आहे.मंत्र्यांचे विरोधी पक्षातील आमदारांना हमरीतुमरीवर येऊन बाहेर ये तुला बघतो. एका मंत्र्यांच्या घरातील वर्तणुकीच्या प्रसिद्ध झालेल्या बातम्या.विधीमंडळ परिसरात दोन आमदारांच्या समर्थकांच्या गैरवर्तनाबद्दल महाराष्ट्र राज्यातील जनतेसमोर प्रश्न निर्माण झाला आहे. याचसाठी यांना निवडून देतो काय ? जनतेच्या मनातील सल मुख्यमंत्र्यांनी बोलून दाखवली 'माजले' आहेत .म्हणून अशी कृत्य करतात. विधिमंडळातील उपहारगृह कर्मचाऱ्यांवर आमदार हात उचलतो, चुकून नव्हे तर अद्दल घडवण्यासाठी सातत्याने मारतो आहे.अशा चित्रफिती प्रसिद्ध झाल्या. पदार्थ निकृष्ट दर्जाचे होते तर कायदेशीर तक्रार कराची होती.सार्वजनिक आरोग्य विभागाने कारवाई केली असती. पण,तसे न करता आपण आमदार आहोत. आपली दहशत लोकांना समजावी म्हणून तर कायदा हातात घेतला नाही ना ? मुख्यमंत्री महोदय माज उतरवण्यासाठी यांच्या सेवा सुविधांवर बंधन घाला. पोलीस संरक्षण काढा, दिलेली वाहने काढून घ्या, सार्वजनिक वाहनातून यांना प्रवास करू द्या. आमदार निधीचे नामकरण करा. त्यांच्या विकास कामाकरता निधी द्या. आमदार निधीतून एवजी विकास निधी म्हणून अमलबजावणी करा .त्या पैशावर, निधीवर शासनाचा अधिकार राहील असे केले तर आमदारांचा उन्माद थांबेल. लोकप्रतिनिधींकडून शासकीय अधिकारी - कर्मचारी यांना मारझोड होते म्हणून आजची हुशार तरूण पिढी शासकीय सेवेत यायला तयार होत नाही.याचाही विचार व्हावा.मुख्यमंत्री म्हणून फडणवीस अशा कृत्यांना पाठीशी घालणार नाहीत असा विश्वास जनता व्यक्त करते. राज्याचे प्रमुख राज्यपाल महोदयांनी महाराष्ट्राची संस्कृती बिघडवणाऱ्या लोकप्रतिनिधींबाबत कठोर निर्णय घ्यावा. असे महाराष्ट्रातील जनतेचे मत आहे.

**महादेव गोळवसकर**
**कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com











श्री संत गजानन महाराज यांच्या पालखीचे सोमवार (दि २१) रोजी जालना शहरात ढोल पथक बँड, घरासमोर रांगोळी, सडा आतिषबाजी करीत पालखीचे मोठ्या उत्साहाने स्वागत करण्यात आले. यावेळी पालखीसोबत एकूण आठशे वारकरी त्यामध्ये झेंडेकरी टाळकरी यांचा समावेश आहे. जालना शहरात पालखीचा दोन दिवस मुक्काम असतो सरस्वती भुवनशाळेच्या मागे कल्याणराव घोगरे स्टेडियम येथे व जेईएस कॉलेज जालना येथे मुक्कामी असणार आहे.

(छाया - अनिल व्यवहारे / जावेंद तंबोली)

# मंगरुळमधील स्वच्छ भारत मिशन घोटाळ्यावर पांघरुण?

## बाळासाहेब खवणे यांचा आंदोलनाचा इशारा !

**मंठा । प्रतिनिधी -** मौजे मंगरूळ येथील स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) २०२१-२२ टप्पा २ अंतर्गत करण्यात आलेल्या घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याची गंभीर तक्रार असून, त्यावर अद्याप कोणतीही चौकशी सुरू न झाल्याने ग्रामस्थांत संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दिनांक २० जून २०२५ रोजी संभाजी ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष शिवश्री बाळासाहेब खवणे यांनी लेखी तक्रार गटविकास अधिकाऱ्यांकडे सादर केली होती. त्यानंतर २४ जून रोजी विस्तार अधिकाऱ्यांना चौकशीचे लेखी आदेश दिले गेले होते. मात्र आज २१ जुलै २०२५ रोजीही कोणतीही चौकशी प्रत्यक्षात सुरू झालेली नाही, अशी गंभीर माहिती समोर येत आहे. हा चौकशीचा आदेश फक्त कागदोपत्री आहे, प्रत्यक्ष काहीच हालचाल झालेली नाही. हे भ्रष्टाचार लपवण्यासाठीचा डाव असल्याची दाट शंका असल्याचे संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब खवणे यांनी म्हटले आहे.

ते पुढे म्हणाले की, गावात अद्याप कोणत्याही अधिकाऱ्याने भेट दिली नाही, पुरावे पाहिले नाहीत किंवा गावकऱ्यांशी संपर्क केला नाही. ही निष्क्रियता व विलंब हेतुपुरस्सर असल्याचा संशय असून, जर २८ जुलैपर्यंत चौकशी सुरू झाली नाही, तर पंचायत समिती मंठा कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा थेट इशारा त्यांनी दिला आहे.




# २२ जुलै रोजी भोकरदन येथे रोजगार मेळावा

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र ,जालना अणि मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भोकरदन यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. २२ जुलै, २०२५ रोजी मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भोकरदन येथे सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. यासाठी अंदाजे ३२७ पेक्षा अधिक रिक्त पदे उपलब्ध होणार आहेत. तरी या रोजगार मेळाव्याचा जास्तीत जास्त उमेदवारांनी उपस्थित राहुन लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे आहे.

रोजगार कार्यालयाकडील नोंदणीकृत सुशिक्षित महिला व पुरुष उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी सहाय्य होण्याच्या दृष्टीने हा रोजगार मेळाव्याचे आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात रोजगार देणाऱ्या विविध नामांकित कंपन्या व नियोक्ते उपस्थित राहुन व प्रत्यक्ष मुलाखती घेवून उमेदवारांची निवड करणार आहे. सदर मेळाव्यामध्ये नियोक्त्यांकडून ३२७ रिक्तपदे एसएससी, एचएससी, कोणतेही पदवीधर, आयटीआय ट्रेडधारक (फिटर, वेल्डर, इलेक्ट्रीशियन, मशिनिस्ट, अप्रेन्टीस ट्रेनी, अकाउंटंट असिस्टंट, डाटा एन्ट्री ऑपरेटर, सर्व्हिस ॲडव्हायझर इत्यादी) १८ ते ४५ वयोगटातील पात्रताधारक उमेदवारांसाठी पदे उपलब्ध झाली आहेत.

तसेच या मेळाव्यात स्वयंरोजगाराबाबत अर्थसहाय्य करणाऱ्या विविध शासकीय महामंडळाचे स्टॉल लावण्यात येणार असुन विविध योजनांचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. याचबरोबर स्टॉलच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनाअंतर्गत विनामुल्य असलेले विविध रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षणाची माहिती देऊन नोंदणी करण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर भेट देऊन आगामी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा या सदराखाली जालना जिल्हा निवडून पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यामधील तपशिल पहावा. याबाबत काही अडचण असल्यास मदतीसाठी कार्यालयाच्या ०२४८२-२९९०३३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा किंवा jalnarojgargmail.com या ई-मेलद्वारे संपर्क साधावा. असेही कळविले आहे.

पान १ वरुन

## पालखीच्या स्वागतातील ...

भाविकांची गर्दी झाली होती. याच गर्दीचा गैरफायदा घेत दोन महिलांनी मंगळसूत्र चोरीचा प्रयत्न केला.

काही सतर्क नागरिकांच्या लक्षात हा प्रकार आल्यानंतर त्यांनी त्या दोघींना पकडून ठेवले व तत्काळ पोलिसांना बोलावले. कदीम जालना पोलिसांनी त्या महिलांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून काही दागिनेही जप्त करण्यात आले आहेत.

दरम्यान, या घटनेनंतर पालखी दर्शनासाठी आलेल्या दोन महिलांची मंगळसूत्रे चोरीला गेल्याची तक्रारही पोलिसांकडे दाखल झाली आहे. पोलिसांनी या घटनेचा अधिक तपास सुरू केला असून, दागिने चोरणाऱ्या टोळीचा शोध घेण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे.

पोलिस प्रशासनाकडून नागरिकांना गर्दीच्या ठिकाणी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## जनसुरक्षा विधेयक ...

दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्य, वैयक्तिक हक्क आणि मूलभूत अधिकारांवर गदा आणणारे आहे. हे संपूर्णपणे लोकशाहीला बाधा आणणारे असल्यामुळे राज्य शासनाने ते तात्काळ रद्द करून मागे घ्यावे.

या निवेदनप्रसंगी जाफराबाद कॉंग्रेस कमिटीचे तालुका अध्यक्ष अजय बनकर, मुरलीधर भोपळे, शेख माजिद शेख इस्माईल, जाफराबाद शहराध्यक्ष शेख साजिद, मेहबूब खान पठाण, बबन पाटील, दादाराव हिवाळे यांच्यासह पक्षाचे इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यकर्त्यांनी यावेळी संविधान वाचवा, हुकूमशाही हटवा, जनसुरक्षा नव्हे, जनदडप विधेयक रद्द करा अशा घोषणा देत निषेध व्यक्त केला.



# परतूर शहरात विकास कामे करण्यासाठी सदैव तयार - मोहन अग्रवाल

**परतुर । प्रतिनिधी -** परतूर शहरातील जुना मोंढा खंडेलवाल गल्लीत श्री दत्त मंदिर येथे २० लक्ष रुपये किमतीचे सभा मंडपाचे भूमिपूजन शिवसेना नेते मोहन अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले सदर सभा मंडपासाठी निधी शिवसेना नेते मोहन अग्रवाल यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर करण्यात आलेला असून या प्रसंगी दत्त मंदिर परिसरातील नागरिकांनी शाल श्रीफळ देऊन सत्कारही करण्यात आला. सत्कारला उत्तर देताना अग्रवाल म्हणाले की, परतूर शहरातील सी. सी. भूमिगत नाली बांधकाम, रस्ते नाल्या ,४० फुटी विद्युत खांब, सभा मंडप विविध नागरिकांच्या समस्या सोडविण्या विषयी मी कटिबद्ध असून शासनाकडून निधी विकास कामाकरिता निधी उपलब्ध करून दिल्याशिवाय शांत बसणार नाही व बाकी असलेले विकास कामे करण्याकरिता सदैव तत्पर राहील अशी या ठिकाणी मी ग्वाही देतो. यावेळी नगरसेवक राजेश खंडेलवाल उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब चिखले तालुका प्रमुख अमोल सुरुंग,व्हीजीएनटीचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव तरवटे, शहर प्रमुख दीपक हिवाळे, युवा सेना तालुकाप्रमुख अविनाश कापसे, श्याम शेठ खंडेलवाल, योगेश खंडेलवाल, लक्ष्मीकांतराव हातवनकर, नटवर खंडेलवाल, पावले गुरुजी, गुणवंत मोर, लक्ष्मीकांत हतवनकर, जयंत हतवणकर ,गोविंद शर्मा, निखिल अग्रवाल, लखन जोशी,शिवा जोशी, प्रणय मोर, सौरभ भारुका, अशोक लाळे, शिवा जोशी, गोपाल गेलोत, केदार खंडेलवाल, यांच्यासह जुना मोंढा परिसरातील महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते, जवळपास आज पर्यंत परतूर शहरात २८ कोटी रुपयांची विकासाची कामे माजी नगराध्यक्ष मोहन अग्रवाल यांच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आली आहेत.




# जालना येथे मंगळवारी प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील नोकरीच्या शोधात असलेल्या युवक-युवतींना विविध खासगी कंपन्या, कारखाने, उद्योग-व्यवसाय आणि आस्थापनेकडील रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या उद्देशाने तसेच रोजगार सहाय्यासाठी विशेष मोहिम सुरू करण्यात आली आहे. याप्रमाणे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,जालना यांचे मार्फत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे मंगळवार दि. २२ जुलै २०२५ रोजी प्लेसमेंट ड्राईव्ह -जागेवर निवड संधीचे आयोजन सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत करण्यात आले आहे. अशी माहिती सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार उद्योजकता, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

राजुरी स्टील प्रा.लि.जालना चे बी.ई.मेकेनिकॅल,बी.ई.इलेक्ट्रिकल उत्तीर्ण करिता इंजीनिअर चे १० पदे, बारावी,आय.टी.आय वेल्डर उत्तीर्ण ९ पदे तसेच स्वतंत्र स्वतंत्र मायक्रोफिन प्रा.लि. जालना चे दहावी,बारावी उत्तीर्ण करिता १०० पदे अशी एकूण १२२ रिक्तपदे प्राप्त झालेली आहेत. याकरीता नोकरी इच्छुक पात्रता धारक उपस्थित होणाऱ्या उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येवून जागेवरच निवडीची संधी उपलब्ध आहे. जालना जिल्ह्यातील नोकरी इच्छुकांनी या संधीचा लाभ व अधिक माहिती घेण्यासाठी विभागाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या वेबसाईटला भेट द्यावी. त्याच प्रमाणे केंद्र शासनाच्या एन.सी.एस. पोर्टलवर रजिस्ट्रेशन करण्यासाठी देखील www.ncs.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी. यापूर्वी नोंदणी केली नसल्यास प्रथम आपली नोंदणी करावी आणि होम पेज वरील नोकरी साधक लॉगिनमधून आपल्या युजर आयडी व पासवर्डच्या आधारे लॉगिन करावे. त्यानंतर डॅसबोर्ड मधील पंडित दीनदयाळ उपाध्याय जॉब फेअर या बटनावर क्लिक करून जालना जिल्हा निवडून त्यातील प्लेसमेंट ड्राईव्हची निवड करावी. उद्योजक, नियोक्तानिहाय त्यांच्याकडील रिक्त पदांची माहिती घ्यावी. याप्रमाणे आवश्यक किमान पात्रता धारण करीत असल्याची खात्री करून उपलब्ध असलेल्या रिक्त पदासाठी ऑनलाईन पद्धतीने आपला पसंती क्रमांक नोंदवावा आणि किमान दोन प्रतीत बायोडाटासह फोटो, शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, इ.कागदपत्रे कंपनींना देण्यासाठी छायाप्रती संच सोबत ठेवून दि. २२ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ प्रत्यक्ष मुलाखतीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकतामार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे उपस्थित राहून या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये सहभागी व्हावे आणि रोजगाराच्या या पर्वणीचा निश्चित लाभ घ्यावा, असेही कळविले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.